Volume-1, Issue-2,August 2018

ANEKANT

# ANEKANT JOURNAL OF HUMANITIES AND SOCIAL SCIENCES

# बारामती नगरपरिषदेच्या माध्यमातून अस्पृशोद्धार

प्रा. सुनिल सुखदेव लोखंडे
सहायक प्राधापक
इतिहास विभाग
तुळजाराम चतुरचंद महाविदयालय, बारामती
जि. पुणे. 07972424179, 09921588505

**Abstract:**

स्थानिक स्वराज्य संस्थाचा विकास जसा जसा होत गेला तसा त्यांच्या माध्यमातून अस्पृशता निवारणाचा पुरस्कार होवू लागला . या बाबतीत बारामती नगरपरिषद आगदी सुरवातीपासून अग्रभागी होती . प्रामुख्याने सफाईची कामे भंगी लोकांकडे असत. मात्र हे लोक बारामती मध्ये नसल्याने त्यांना काही सवलती देवून त्यांना बारामतीमध्ये आणण्याचा प्रयत्न केला होता. यापैकी एक उदाहरण म्हणजे मन्नू लुग्मन हा होता . त्याने १९०४ मध्ये सर्व्हे. नं. २६८ मधील ४-२७ एवढी जमीन बारामती येथे २० रुपये देवून खरेदी केली होती . तिचा आकार रू. १-१२ एवढा होता परंतु पुढे त्या जागेवर नगरपरिषदेणे प्लेगचा दवाखाना काढला . त्या जागेचा सारा मात्र मन्नू लुग्मनच भरत होता . त्यामुळे त्याने नगरपरिषदेकडे मला नुकसानभरपाई द्यावी किंवा ती जागा विकत घ्यावी असा अर्ज केला त्यानुसार नगरपरिषदेणे ती जागा २५ रू. देवून घेण्याचा ठराव केला व ती जागा घेण्याचा ठराव १६-४-१९०४ रोजी करून ती जागा घेतली .

यानंतर पुढे नवीन येणाऱ्या भांग्यांना झोपड्यांसाठी सर्व्हे . नं. ३ मधील जागा द्यावी व मदत म्हणून ४०/- रुपये प्रत्येकी द्यावेत असा ठराव १७ – १० - १९२२ रोजी झाला. हे सर्व नगरपरिषदेच्या माध्यमातून घडत होते. याचे कारण म्हणजे तेथी काही व्यक्ती व पदाधिकारी परिवर्तनवादी विचारांचे होते. उदा. तत्कालीन सेक्रेटरी श्री. म. ना. सहस्रबुद्धे हे मुन्सिपल नोकर होते ते भंगी समाजात मिसळत असत व त्यांच्यामध्ये होणारे नाटक भजन या

मध्ये सामील होत असत . श्री. हिरा लालबिगे हा सफाई कामगार एकतारी भजन उत्तम गात असे . तसेच नगरपरिषदेचे एक माजी शिक्षक व नंतरचे नगरपरिषदेचे सभासद श्री . हरी पिराजी धायगुडे यांनी सर्व जातीच्या विद्याथ्यांसाठी १९२४ मध्ये श्री. अहिल्याबाई बोर्डिंग सुरु केले होते.

भंगी समाजातील व अस्पृश वर्गातील सर्व विद्यार्थ्यांमध्ये समानता आणण्याचा प्रयत्न म्हणून शाळेत अस्पृशता पाळली जावू नये. असा ठराव ई.स. १९१९–२० मध्ये झाला. त्यांनंतर पुढे १९ वर्षांनतर ३१-५-१९३९ रोजी नगरपरिषदेच्या मालकीच्या विहिरी, धर्मशाळा हरिजनांना सुद्धा खुले आहेत. अशा तेथे पाट्या लावाव्यात असा ठराव केला . स्वातंत्र्याच्या प्राप्ती नंतर अधिक भरीव कामांना नगरपरिषदेच्या माध्यमातून सुरुवात झाली. त्याचे उदाहरण म्हणजे अस्पृश्य कामगारांच्या वसाहतीसाठी रुपये २५००० /- खर्च करण्याचा २७ - १२ – १९४८ रोजी करून श्री . श्रीरंग सटवाजी सोनावणे , श्री. माणिकलाल तुळजाराम शहा, श्री. उध्दव राव लक्ष्मण इंगुले , श्री. एन. जी. काळोखे व श्री. व्य. ग. तावरे या सभासदाची उपसमिती नेमून सादर कार्य केले मुंबई राज्याचे तत्कालीन अर्थमंत्री श्री . वैकुंठभाई मेहता यांच्या हस्ते वसाहतीची कोनशीला दिनांक १९-५-१९४८ रोजी बसविली त्यांनंतर वसाहतीचे काम एका वर्षात पूर्ण होवून मंत्री गणपतराव तपासे यांच्या हस्ते १५ -३-१९४९ रोजी उदघाटन झाले . नंतर १९-११-१९५२ रोजी मध्ये आणखी चार खोल्यांचे बांधकाम केले . त्यानंतर अस्पृश्य वडार इत्यादी यांच्यासाठी घरे बांधण्यास मदत करण्यास सुरुवात झाली . नंतर जागा विकत न देता ९९ वर्षाच्या कराराने देण्याचे धोरण स्वीकारले आणि १९५२ मध्ये गाडी वडार हौसिंग सोसायटी, अस्पृश्योद्धार हौसिंग सोसायटी, हरिजन हौसिंग सोसायटी, संस्थांच्या कामाला सुरुवात होवून राहाण्याचा अस्पृशांचा प्रश्न काही प्रमाणात सुटन्यास मदत झाली या नंतर विकास , मांग गारुडी इत्यादी सहकारी गृह निर्मान संस्थासुरु झाल्या . अस्पृश्य वर्गातील विद्यार्थ्यांना वसतिगृहाची तात्पुरती सोय व्हावी म्हणून दाने बाजारातील तीन गोदामे

वर्षाला एक रुपया असे नाममात्र भाडे घेवून १६-६-१९५८ रोजी दिले. बारामती शहरात नगरपरिषदेच्या माध्यमातून स्वतंत्र्यरित्या अनेक मागासवर्गीय सोसायट्या स्थापन करून राहण्याचा प्रश्न सोडविला जात आहे दिवसेंदिवस शहराची वाढती लोकसंख्या वसाहतीमधील कमी पडणारी खोल्यांची संख्या , यासाठी नवीन जागी वसाहतीची योजना राबविता येयील का याचा विचार मा. अजितदादा पवार व राष्ट्रीय नेते शरदचंद्रजी पवार व मा . खासदार सुप्रिया ताई सुळे हे नेते दलि त वर्गाला नगरपरिषदेच्या माध्यमातून कशा सोयी उपलब्ध करून देता येतील यासाठी प्रयत्नशील आहेत.

**भंगीमुक्ती**

अस्पृश्योद्धारा नंतरचे महत्वाचे नगरपरिषदेचे काम म्हणजे भंगीमुक्ती होय. भंगी समाजातील लोकांनीच सफाईचे काम केले पाहिजे असा समज हळूहळू दूर होवून दिवसेंदिवस सफाईचे कामात बदल होत जावून यंत्राच्या माध्यमातून कचरा उचलणे सफाई करणे अशी कामे होवू लागल्याने इतर समाजातील लोक रोजगाराच्या दृष्टीने सफाईचे काम करू लागले आहेत . या उलट भंगी समाजातील लोक आपल्या मुलांना शिकवू लागल्याने विविध शासकीय पदावर नियुक्त झाले आहेत . अशाप्रकारे नगरपरिषदेणे अस्पृश्योद्धाराचे व भंगीमुक्तीचे काम केल्याचे दिसते.

**निष्कर्ष :**

बारामती नगरपरिषदेणे आपल्या माध्यमातून अस्पृश्योद्धाराचे कार्य हाती घेवून सर्वं जातींच्या साठी व विद्यार्थ्यांच्या निवासाचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला आहे . विशेषतः दुर्लक्षित अशा भंगी समाजाला परंपरागत सफाईच्या व्यवसायातून बाहेर काढून मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला आहे .

**संदर्भ :**


- सहस्त्रबुद्धे .श्री. म . शताब्दीपूर्ती समाचार बारामती प्रकाशन १९६५.
- बारामती नगरपरिषदेचा १९०४ चा अहवाल .
- बारामती नगरपरिषदेचा १९२० चा अहवाल .
- बारामती नगरपरिषदेचा १९२२ चा अहवाल .
- बारामती नगरपरिषदेचा १९२४ चा अहवाल .
- बारामती नगरपरिषदेचा १९३९ चा अहवाल .
- बारामती नगरपरिषदेचा १९४८ चा अहवाल .
- बारामती नगरपरिषदेचा १९४९ चा अहवाल .
- बारामती नगरपरिषदेचा १९५२ चा अहवाल
- बारामती नगरपरिषदेचा १९५८ चा अहवाल .


**मुलाखत :**

श्री. सुनिल शिंदे ( सामाजिक कार्यकर्ता )

श्री. अनिल जाधव. (उपाध्यक्ष, बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस)

- श्री. प्रकाश लालबिगे ( संचालक, बारामती सहकारी बँक )
- श्री.संजय लालबिगे ( नगरसेवक, नगरपरिषद बारामती )
- श्री. विजय खरात ( माजी उपनगराध्यक्ष, बारामतीनगरपरिषद